## स्वच्छतेच्या सोयी आणि हिंसाचार : पुणे शहरातील वस्त्यांमधील महिलांचे अनुभव

स्नेहा भट, शबाना दिलेर

*"आम्ही २० वर्ष झाली इथं राहतोय, पण अजूनही आम्हांला पणी आणि संडासची सोय नाही. किती नेते आले आणि गेले. कोणत्याही सोयी द्यायच्या म्हंटलं की आम्हांला सांगतात आमच्या वस्तीला परवानगी नाही म्हणून. मग निवडणुकीच्या वेळेला आमची मतं कशी चालतात?"* पुण्यामधल्या एका अघोषित वस्तीमध्ये गटचर्चा चालू असताना महिलांनी केलेला प्रश्न. संडासाची सोय जवळपास उपलब्ध नसल्याने ह्या महिलांची मोठी गैरसोय होत होती.

अशा प्रकारच्या अनेक वस्त्या आज आपल्या शहरांमध्ये आहेत. जागतिक आरोग्य संघटना आणि युनिसेफ ह्यांच्या निरीक्षणाप्रमाणे अलीकडच्या काळात ग्रामीण भागात उघड्यावर शौचाला जाणाऱ्या लोकांची संख्या कमी होत असली, तरी शहरी भागात मात्र ही संख्या वाढते आहे. हे लोक शहरातल्या वस्त्यांमध्ये राहणारे कष्टकरी वर्गातले लोक आहेत. पुणे शहराचा विचार केला तर शहरामध्ये आज ५०० हून अधिक वस्त्या आहेत, आणि शहराची साधारण ३०% लोकसंख्या ह्या वस्त्यांमध्ये राहात असल्याचा अंदाज आहे. आजपर्यंतच्या आमच्या अनुभवावरून ह्यापैकी अनेक वस्त्यांमध्ये स्वच्छतेच्या सोयी एक तर अपुऱ्या आहेत, किंवा अजिबात अस्तित्वात नाहीत. पुणे शहरामध्ये अंदाजे १०० अशा जागा आहेत, ज्या लोक उघड्यावर शौचाला जाण्यासाठी वापरतात. ज्या वस्त्या अजून घोषित झालेल्या नाहीत, त्याठिकाणी परिस्थिती अधिक कठीण आहे. अशा वस्त्यांमध्ये शासनाने पाणी आणि स्वच्छतेसारख्या प्राथमिक सुविधा पुरवणे अपेक्षित असले तरी, अनेक ठिकाणी तसे झालेले दिसत नाही.

स्वच्छतेच्या सोयी उपलब्ध नसणे हा स्त्रियांसाठी गंभीर प्रश्न आहे. हा प्रश्न केवळ त्यांच्या प्रायव्हसीचा नसून सुरक्षिततेचा आहे. उघड्यावर शौचाला जाणाऱ्या किंवा सार्वजनिक स्वच्छतागृहांचा वापर करणाऱ्या स्त्रियांना वेगवेगळ्या प्रकारच्या हिंसेला तोंड द्यावं लागतं. अशा वेळी स्त्रियांवर बलात्कार होण्याच्या घटनांचे प्रमाणही मोठे आहे. त्या दृष्टीने स्वच्छतेच्या सोयी पुरेशा नसल्याने महिलांना काय प्रकारच्या अडचणी येतात, आणि त्याचा त्यांच्यावर काय परिणाम होतो, हे जाणून घेण्यासाठी सोपेकॉमने पुणे शहरात नुकताच एक अभ्यास केला. त्यावेळी पुण्यातल्या १२ वस्त्यांमधल्या स्त्रियांशी गटचर्चा आणि सविस्तर मुलाखतींमधून आम्ही संवाद साधला. ह्या महिलांनी त्यांचे जे अनुभव आम्हांला सांगितले त्यापैकी काहींची मांडणी करण्याचा प्रयत्न ह्याठिकाणी केला आहे.

### सार्वजनिक स्वच्छतागृहांची अवस्था

अभ्यासातल्या काही वस्त्यांमध्ये सार्वजनिक स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध होती, पण सर्व ठिकाणी महिलांनी ती पुरेशी नसल्याचं सांगितलं. स्वच्छतागृहांची देखभाल केलेली नाही,

दरवाजे तुटलेले आहेत, लाईटची सोय नाही, पाणी नाही, स्वच्छता राखलेली नाही ह्यासारख्या अडचणी तर होत्याच, पण त्याचबरोबर अनेकदा त्याठिकाणी सुरक्षित वाटत नसल्याचं ही महिलांचं म्हणणं होतं. *"आम्ही ज्याठिकाणी जातो, तिथे खालच्या मजल्यावर पुरुषांचे संडास आहेत, आणि वरच्या मजल्यावर बायकांचे. त्याला दार एकच आहे, आणि दुसऱ्या मजल्यावर गच्ची असल्याने कोणीही वर चढून येतं, आणि तिथला वॉचमन काही बोलत नाही. काही लोक ह्या गच्चीवर जाऊन दारू पीत बसतात. त्यामुळे तिकडे एकट्याने जायची भीती वाटते. परवा मी दुपारच्या वेळेला एकटी गेले, तर एक माणूस माझ्या मागोमाग वर आला. आत गेल्यावर तो बाहेर जिन्यावरच उभा आहे हे माझ्या लक्षात आलं. मी खूप वेळ आतच थांबून राहिले, आणि तो वर निघून गेला तेंव्हा बाहेर येऊन पळत खाली आले."* एका तरुण मुलीने तिचा अनुभव सांगितला. बहुतेक महिला ज्यावेळी तिथे वर्दळ नसेल अशा वेळी एकट्यानं तिथे जाण्याचं टाळतात. आणि प्रत्यक्ष हिंसेचा अनुभव आलेला नसला तरी स्वच्छतागृहाच्या वॉचमन कडून शेरेबाजी, तिकडे जाण्याच्या रस्त्यावर बसून मुलांनी छेड काढणे, भिंतीवर लिहिलेला अश्लील मजकूर असे अनुभव महिलांना नेहमीच येत असतात.

**उघड्यावर जाणाऱ्या महिलांच्या अडचणी**

अर्थात ज्या महिलांना सार्वजनिक स्वच्छतागृहाची सोयही उपलब्ध नाही, त्यांची परीस्थिती अधिक बिकट आहे. ह्या महिलांना रोज शक्य तेवढ्या आडोशाची जागा शोधून काढणे, कमीत कमी वर्दळ असेल अशा वेळी आपले विधी उरकणे, सतत आजूबाजूला कोणी आहे का ह्याकडे लक्ष ठेवणे अशी कसरत करावी लागते. एका महिलेने ती उघड्यावर शौचाला गेलेली असताना शेजारी राहणाऱ्या एका पुरुषाने तिच्यावर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केल्याचा अनुभव आम्हांला सांगितला. *"एक दिवस जावं लागलं म्हणून मी दुपारच्या वेळेला एकटीच गेले होते. तो चालत माझ्या बाजूला येताना दिसला, म्हणून मी उठून उभी राहिले. मला वाटलं तो पुढे निघून जाईल, पण तो सरळ माझ्या अंगावर आला. मी खाली दगडावर पडले आणि मला खरचटलं. मी मदतीसाठी आरडाओरडा केला. नेमकी आमच्या वस्तीतली आणखी एक बाई त्यावेळेला तिकडे आली होती. तिला बघून त्याने मला सोडून दिलं आणि तो निघून गेला."* तिने ह्या प्रसंगानंतर पोलिसात तक्रार करण्याचा प्रयत्न केला, पण अपेक्षेप्रमाणेच त्यातून पुढे काही निष्पन्न झालं नाही.

अशा प्रत्यक्ष हिंसेच्या व्यतिरिक्त ही इतर वेगवेगळ्या प्रकारच्या हिंसेचा सामना महिलांना नेहमीच करावा लागतो. *"हे असं नेहमीच होत असतं. गडी माणसं मुद्दाम बायकांच्या जागेकडे चालत येतात. बायकांना बघत बसतात. काही-बाही बोलतात. आणि बायकांकडे पाहून घाणेरड्या हालचाली करतात.* (हस्तमैथुन)" *"सुट्टीच्या दिवसांमध्ये तरुण मुलं वस्तीतल्या टाकीवर चढून बसतात, आणि खालच्या बाजूला बायका जातात त्यांना बघत बसतात." "एकदा आमच्या वस्तीत येऊन एक माणूस मोबाईल फोनमध्ये बसलेल्या बायकांचे फोटो*

*काढत होता." "एकदा मी एकटी गेलेले असताना, एक माणूस अचानक आला, आणि त्याने माझा हात धरला. मी धडपड करून तो सोडवून घेतला आणि धावत परत आले."*

**बायकांना घ्यावी लागणारी खबरदारी**
अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी मग ह्या महिला, वेगवेगळ्या प्रकारचे उपाय करतात. एकट जाण्याऐवजी कोणाला तरी सोबत घेऊन जातात. आपल्या सोबत दगड किंवा तिखट ठेवतात. शक्य असेल तर कामाच्या ठिकाणी संडासचा वापर करतात. पण सगळ्यात महत्वाचं म्हणजे दिवसा उजेडी जायला लागू नये ह्यासाठी त्यांना स्वतःच्या शरीराला तशी सवय लावावी लागते. त्याचबरोबर वरचेवर जायला लागू नये ह्यासाठी कमी जेवतात, आणि पाणीही कमी पितात.

**शारीरिक आणि मानसिक ओढाताण**
अपुऱ्या सोयी आणि त्यामुळे केल्या जाणाऱ्या अशा प्रकारच्या तडजोडी, ह्यामुळे अर्थातच आरोग्यावर त्याचा अनिष्ट परिणाम होतो. ह्या महिलांमध्ये पोटाचे विकार, मुतखडा, युरीन इन्फेक्शन ह्यासारख्या आजारांचं प्रमाण मोठ होतं. तसेच बाळंतपणात त्यांचे अधिक हाल होतात. *"माझं सासर-माहेर दोन्ही ह्याच वस्तीत, त्यामुळे दवाखान्यातून घरी आलं की संडासची काहीच सोय नाही. तिकडं लांब पलीकडच्या वस्तीत चालत जायचं. दुसरं करणार काय?"*

शारीरिक आजारांबरोबरच अशा घटनांमुळे महिलांना वेगवेगळ्या प्रकारचे मानसिक ताणतणाव जाणवतात. प्रत्यक्ष हिंसेचा अनुभव आला असेल तर त्याचे मानसिक परिणाम अधिक गंभीर असतात आणि अधिक काळापर्यंत राहतात. पण त्या व्यतिरिक्त ही कोणीतरी आपल्याला पाहिलं ह्या भावनेने वाटणारी लाज, कोणीतरी आपल्यावर हल्ला करेल ह्या विचाराने वाटणारी भीती, तरुण मुलींची चिंता, इतरांना सांगितलं तर त्यांची प्रतिक्रिया काय असेल ह्याची काळजी, अशा वेगवेगळ्या प्रकारच्या तणावाखाली ह्या महिला वावरत असल्याचं दिसलं. *"सतत आजूबाजूला लक्ष ठेवावं लागतं. कोणी येताना दिसलं की उभं राहायचं आणि मग परत बसायचं असं चालू असतं." "विचार करा तुमच्या ओळखीच्या एखाद्या गाडी माणसानं तुम्हांला अशा अवस्थेत पाहिलं तर कसं वाटेल? पुढच्या वेळेला त्या माणसाला भेटलं की इतकी लाज वाटते." "मी माझ्या मुलीला चुकून सुद्धा एकट जाऊ देत नाही. सतत तिच्यावर लक्ष ठेवून असते. मी आता तिला माझ्या बहिणीकडेच पाठवून देणार आहे. त्यांच्या घरी चांगली सोय आहे, काही अडचण नाही." "कधी काही झालं तरी मी मी माझ्या नवऱ्याला सांगत नाही. त्याने डोक्यात राख घालून घेऊन, जाऊन कोणाचं डोक फोडलं, तर ते कोण निस्तरणार नंतर?" "असल्या गोष्टी वस्तीत इतर कोणाला सांगायची सोय नाही. तुमच्या बाबतीत असं झालं म्हणजे तुमचीच काहीतरी चूक असणार असं लोक समजतात."* पण त्याचबरोबर काही महिला अशाही होत्या ज्यांनी त्यांच्या कुटुंबाकडून, शेजाऱ्यांकडून, वस्तीमधील इतर महिलांकडून त्यांना मिळणाऱ्या सहकाऱ्यामुळे अशा परिस्थितीशी सामना करणं त्यांना कसं

शक्य होतं ते सांगितलं. *"आमच्या इथल्या बायकांची खूप एकी आहे. सगळ्या एकमेकींच्या मदतीला येतात. आमच्या वस्तीत येऊन एखाद्या माणसाने आम्हांला त्रास द्यायचा प्रयत्न केला, तर आम्ही त्याला सोडत नाही, धरून मारतो आणि पोलिसात घेऊन जातो."*

**समारोप**

स्वच्छतेच्या सोयी नसल्यामुळे होणारी हिंसा हा जरी सर्व महिलांचा प्रश्न असला, तरी त्यांना येणारे अनुभव हे त्यांची जात, वर्ग, वस्तीमधील कुटुंबाचे स्थान, वय, वैवाहिक दर्जा, ह्याप्रमाणे निश्चितच बदलत जातात. उदाहरणार्थ वयस्कर महिलांना जाणवणाऱ्या अडचणी ह्या हिंसेशी संबंधित नसून वयोमानामुळे जाणवणाऱ्या होत्या. वस्त्यांमधील काही महिलांनी आपल्या घरी संडास बांधून घेतलेले होते, परंतु त्यासाठी लागणारा पैसा उभं करणं, तसेच तेवढी जागा देणं वस्ती मधील सर्वांनाच शक्य होऊ शकत नाही. आणि आपल्याला माहितीच आहे की काही जातींच्या महिलांवर अत्याचार होण्याची शक्यता अधिक असते.

ह्या महिलांशी बोलत असताना एक गोष्ट आम्हाला प्रकर्षानं जाणवली, ती म्हणजे स्वच्छतेच्या सोयी नसणं आणि त्यामुळे येणाऱ्या ह्या सगळ्या अडचणी, हा त्यांना जगण्यासाठी जो झगडा रोज करावा लागतो त्याचा एक भाग आहे. वर उल्लेख केलेल्या प्रसंगामध्ये, ज्या महिलेवर तिच्या शेजारी राहणाऱ्या पुरुषाने हल्ला केला, ती महिला विधवा आहे. तिचा नवरा गेल्यापासून शेजारी राहणाऱ्या पुरुषांनी ह्या न त्या प्रकारे तिला त्रास देण्याचा अनेकदा प्रयत्न केलेला होता. एका महिलेचा नवरा तिच्यावर सतत संशय घेऊन, तिच्या हिंडण्या फिरण्यावर बंधन घालून तिला मारहाण करत होता. तर एका वस्ती मध्ये त्यांची पूर्ण वस्तीच उठवल्यामुळे लोकांवर फुटपाथ वर राहण्याची वेळ आली होती. जात, वर्ग आणि पितृसत्ताक व्यवस्था ह्या तीनही रचनांमध्ये तळाला असणाऱ्या ह्या महिलांना जाणवणाऱ्या ताणतणावांची कारणं ही अशी अनेक होती. ह्या तणावांमध्ये स्वच्छतेच्या सोयी नसल्याने अधिक भर पडत असते. ह्या सोयी त्यांना उपलब्ध झाल्या आणि त्या सुरक्षितपणे वापरता येतील अशी खात्री वाटली, तर त्यांच्या दैनंदिन आयुष्यातील निदान एक तणाव कमी होऊ शकेल.

(हा लेख सोपेकॉमने (www.soppecom.org) केलेल्या **Sanitation Vulnerability: Women's Stress and Struggles for violence-free sanitation** ह्या अभ्यासावर आधारित आहे.)

(सदर लेख 'मिळून साऱ्याजणी' च्या सप्टेंबर २०१४ च्या अंकामध्ये छापून आलेला आहे.)